पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे मुखपत्र

# कल्याणवार्ता

• अंक : २७ • फेब्रुवारी २०१३ • पृष्ठे ४

इंटरनेट आवृत्ती - www.punecorporation.org

## क्रीडा स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ

कामगार कल्याण निधीमार्फत दि.१४ ते १९ जानेवारी,१३ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या विविध क्रीडा स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ दि. १/२/१३ रोजी सायं. ५ वाजता पं. नेहरु स्टेडियम येथे संपन्न झाला. या समारंभास मा. सुधाकर देशमुख, विशेष कार्याधिकारी (दक्षता), मा. आर.टी.शिंदे, उप आयुक्त (भूसंपादन), मा. डी.पी.मोरे, उप आयुक्त (गवनि), मा. श्रीमती मंजुषा इधाटे, म्युनिसिपल प्रॉसिक्युटर, मा. शिवाजी दौंडकर, सल्लागार (कामगार) तथा सचिव, कामगार कल्याण निधी, मा.अरुण खिलारी, कामगार कल्याण अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, श्री.नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी हे उपस्थित होते.

उपस्थित सर्व प्रमुख पाहुण्यांचे मा. सचिव यांनी पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. प्रास्ताविकात मा. सचिव यांनी सभासद सेवकांमधील सुप्त कला गुणांना वाव देणे, परस्परांमध्ये सहकार्य व सामंजस्याची भावना वाढीस लागून कामातील कार्यक्षमता वाढणेकामी निधीमार्फत हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे नमूद केले. यामध्ये सुरुवातीस महिलांचा अत्यल्प प्रतिसाद मिळत होता. या वर्षी समन्वयकांच्या उत्स्फूर्त परिश्रमामुळे महिलांचा सहभाग वाढल्याचे सिध्द झाले आहे. ही कौतुकास्पद बाब असल्याचे मा.सचिव यांनी मान्य केले.



तदनंतर उपस्थित मा. आर.टी.शिंदे, उप आयुक्त यांनी सर्व खेळाडूंना मार्गदर्शन केले. त्यांनी प्रत्येक सेवकाने क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घेतला पाहिजे. प्रशासनाने सेवकांसाठी ज्या सेवासुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत त्याचा सर्व सेवकांनी लाभ घेतला पाहिजे. त्यातूनच सेवकांमधून चांगले खेळाडू निर्माण होतील व सेवकांचे आरोग्यही चांगले राहण्यास मदत होईल, असे नमूद करुन सर्व विजेत्यांना शुभेच्छा दिल्या.

तसेच, कार्यक्रमास उपस्थित मा. डी.पी.मोरे, उप आयुक्त(गवनि) यांनी कार्यक्रम सुरु असतानाच क्रीडा स्पर्धांवर एक कविता रचली. सदर कवितेमध्ये सर्व खेळांची नावे व त्याचे फायदे त्यांनी नमूद केले होते. त्यांच्या कवितेस सर्व स्पर्धकांनी उत्स्फूर्त दाद दिली. तसेच, त्यांनी त्यांच्या दिलखुलास शैलीमध्ये स्पर्धकांना मार्गदर्शन केल्याने समारंभाची रौनक आणखी वाढली.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. सुधाकर देशमुख यांनी मार्गदर्शन करताना कामगार कल्याण निधीतर्फे आयोजित क्रीडा स्पर्धा हा उपक्रम सातत्याने चालू रहावा अशी सदिच्छा व्यक्त करुन सर्व विजेत्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच, सर्व खेळाडूंनी जरी आपण स्पर्धेमध्ये हरलो असलो तरी आपली जिद्द कायम ठेवून पुढच्या वेळेस आपण कसे जिंकू याबाबत आत्मविश्वास बाळगला पाहिजे, असे नमूद केले.

कामगार कल्याण निधीमार्फत एकूण १५ क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर स्पर्धांमधील विजेत्या स्पर्धकांना स्मृतिचिन्हे व प्रमाणपत्र देवून त्यांचा यथोचित गौरव करण्यात आला. क्रिकेट, व्हॉलिबॉल व कबड्डी या सांघिक स्पर्धेत अजिंक्यपद मिळविलेल्या तिन्ही संघांना फिरते चषक प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा. नितीन केंजळे,कामगार कल्याण अधिकारी व आभार प्रदर्शन मा. अरुण खिलारी, कामगार कल्याण अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त यांनी केले.

## पुणे महानगरपालिकेचा ६३ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा

पुणे महापालिकेचा ६३ वा वर्धापनदिनानिमित्त दि.१४ ते १७ फेब्रुवारी, २०१३ दरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दि.१५ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.०० वाजता मा.सौ.वैशाली बनकर, महापौर, पुणे यांनी मनपा भवन प्रांगणातील महात्मा ज्योतीबा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

**फोटोग्राफी व पेंटिंग प्रदर्शन** – वर्धापन दिनानिमित्त पुणे महानगरपालिका सांस्कृतिक कलामंचातर्फे दिनांक १४ ते १७ फेब्रुवारी, २०१३ या कालावधीत बालगंधर्व रंगमंदिरातील कलादालनात फोटोग्राफी व पेंटिंग प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. सदर प्रदर्शनाचे उद्‌घाटन मा.सौ.वैशाली बनकर, महापौर, पुणे यांच्या हस्ते व मा.बाबुराव चांदेरे, अध्यक्ष, स्थायी समिती यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या प्रसंगी मा.महेश पाठक, महापालिका आयुक्त, मा. राजेंद्र जगताप, अतिरिक्त महापालिका आयुक्त (इस्टेट), मा. प्रशांत वाघमारे, नगर अभियंता, मा. विवेक खरवडकर, अतिरिक्त नगर अभियंता, श्री. प्रमोद यादव, विशेष कार्याधिकारी (घनकचरा व्यवस्थापन), मा. शिवाजी दौंडकर, सल्लागार (कामगार) व महापालिकेचे इतर अधिकारी उपस्थित होते. सदर प्रदर्शनात मा. प्रशांत वाघमारे, नगर अभियंता, मा. विवेक खरवडकर, अतिरिक्त नगर अभियंता, श्री. प्रमोद यादव, विशेष कार्याधिकारी (घनकचरा व्यवस्थापन), श्री. रामदास जाधव, विभाग प्रमुख, श्री. शिवाजी केदारी, सरलेखनिक, श्री. सुरेंद्र वाळके, श्री. श्रीरंग राजपाठक, श्री. सुरेश परदेशी या अधिकारी/सेवकांनी सहभाग घेतला होता. प्रदर्शन पाहिल्यानंतर मा.महापौर यांनी आपल्या भाषणामध्ये स्वत:चे दैनंदिन कामकाज सांभाळून महापालिका अधिकारी व कर्मचारी इतके उत्कृष्ट छंद जोपासू शकतात यावर विश्वास बसत नसल्याचे सांगितले. तसेच, पुणे महापालिका ही भारतातील उत्कृष्ट महापालिका आहे, महापालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी अहोरात्र काम करुन नागरिकांना चांगल्या प्रतीच्या नागरी सुविधा उपलब्ध करुन देतात याची प्रचिती या प्रदर्शनातून येत असल्याचे नमूद केले. तसेच, महापालिका अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या फोटोग्राफीमधून त्यांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू स्पष्ट होत असून पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनाचा संदेश सर्वसामान्य नागरिकांना मिळाला असल्याचे नमूद केले. तसेच, महापालिका अधिकारी/कर्मचाऱ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी यापुढे भरीव मदत करण्याचे आश्वासन दिले. स्थायी समितीचे अध्यक्ष मा. बाबुराव चांदेरे यांनी सांगितले की, अधिकारी/कर्मचारी यांनी व्यस्त दिनक्रमातून वेळात वेळ काढून पर्यटनाच्या माध्यमाने ज्या निसर्ग, सौंदर्य, पक्षी, प्राणी यांची छायाचित्रे घेतली, जी चित्रकला सादर केली त्या कलाकृती अतिशय दर्जेदार आहेत. सदरचे प्रदर्शन यशस्वी होण्यासाठी श्री.सुरेश परदेशी व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी विशेष कष्ट घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश परदेशी यांनी केले तर आभार प्रदर्शन स्थायी समिती अध्यक्ष मा. बाबुराव चांदेरे यांनी केले.



आयोजित करण्यात आलेल्या प्रदर्शनात निसर्ग सौंदर्य, जंगलातील प्राणी, पक्षी, डोंगर, दऱ्या, विविध प्रकारचे वृक्ष, दुर्गम किल्ले, कार्टुन्स, व्यंगचित्रे अशा विविध प्रकारची छायाचित्रे व चित्रे य ांचा समावेश होता. छायाचित्र प्रदर्शन पाहण्यासाठी प्रसिध्द सिनेकलाकार मा. नाना पाटेकर हे आवर्जून आले व सर्व कलाकारांना उत्स्फूर्त दाद दिली.

**रक्तदान शिबीर**– महापालिकेच्या ६३ व्या वर्धापन दिनानिमित्त पुणे महापालिका आरोग्य विभाग व श्री. आनंद ऋषीजी ब्लड बँक, नवी पेठ यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे महानगरपालिकेच्या प्रांगणातील हिरवळीवर रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीराचे उद्‌घाटन मा.वैशाली बनकर, महापौर, पुणे यांच्या हस्ते करण्यात आले. सदरचे शिबीर यशस्वी करण्यासाठी डॉ.एस.टी.परदेशी, आरोग्य प्रमुख व त्यांच्या सहकार्यांनी विशेष प्रयत्न केले.

**लावणी कार्यक्रम संपन्न**– पुणे महापालिकेच्या ६३ व्या वर्धापन दिनानिमित्त दिनांक १४ फेब्रुवारी रोजी बालगंधर्व रंगमंदीर येथे लावणी सम्राज्ञी अर्चना जावळेकर यांचा नटखट अप्सरा या लावण्यांचा कार्यक्रम खास महिलांकरिता आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास महिलांचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद लाभला.

**फळे, फुले व भाजीपाल्याचे प्रदर्शन** महापालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त दिनांक १६ व १७ फेब्रुवारी, २०१३ रोजी वृक्ष प्राधिकरणाच्या वतीने फळे, फुले व भाजीपाल्याचे ३३ वे प्रदर्शन छत्रपती संभाजीराजे उद्यानामध्ये भरविण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्‌घाटन मा.वैशाली बनकर, महापौर, पुणे यांचे शुभ हस्ते करण्यात आले. नागरिकांना निसर्गातील विविधता पाहता यावी व त्याद्वारे त्यांच्यामध्ये निसर्ग संवर्धनाची जाणीव निर्माण व्हावी आणि शहरातील हरित पुणे प्रकल्पाच्या कार्यामध्ये त्यांचा सहभाग वाढावा या उद्देशाने सदर प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनामध्ये शोभिवंत पानाफुलांच्या कुंड्यांची मांडणी, फुलांची कलात्मक मांडणी व सजावट, गुलाब पुष्प मांडणी, हंगामी तसेच वार्षिक फुले, निर्यातक्षम फुले, गुलाब, जरबेरा, कार्नेशन, अँथुरियम, ऑर्किड, लिलियम, बोन्साय झाडे, काष्टशिल्प, मिनियेचर डिश गार्डन, वेली बास्केट, फुलांचे ऑर्किड, पानवनस्पती अथवा फुले, फळे व भाजीपाला विभाग, फळे-फुले व भाज्यांवर प्रक्रिया करुन केलेले पदार्थ, निसर्ग व पर्यावरणावर आधारित छायाचित्रे इत्यादींचा समावेश होता. सदर प्रदर्शनास पुणेकरांनी २ दिवसांमध्ये विक्रमी, उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.या उपरोक्त प्रदर्शनाद्वारे आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ रविवार दि.१७/२/१३ रोजी छत्रपती संभाजीराजे उद्यान येथे आयोजित करण्यात आला होता. प्रदर्शनामध्ये सहभाग घेतलेल्या विविध स्पर्धकांना पारितोषिके देवून सन्मानीत करण्यात आले. या प्रसंगी मा.महापौर यांनी सांगितले की, प्रदर्शित केलेली प्रत्येक कलाकृती वैशिष्टयपूर्ण, माहितीपूर्ण व नाविन्यपूर्ण होत्या. विविध कला प्रकार आकर्षक मांडणीमुळे लक्षवेधी ठरत होते. या कार्यक्रमास मा.पदाधिकारी, अधिकारी, मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी मा.श्री.सुनिल केसरी, मुख्य उद्यान अधिक्षक व उद्यान विभागाकडील त्यांच्या सहकार्यांनी विशेष परिश्रम घेतले.

पान क्र. ३ वर

# २७ फेब्रुवारी - मराठी भाषा गौरव दिन

***पुष्पांमाजी पुष्प मोगरी।***
***सुवासामाजी सुवास कस्तुरी।।***
***भाषामाजी तैसी साजिरी।***
***माझी मराठी भाषा खरी।।***

मराठी मातृभाषेचे सौंदर्य, ऐश्वर्य, वैभव वाढविण्यात आपणा सर्वांनीच प्रयत्नशील असणे फार गरजेचे आहे. मराठी भाषेचे जतन संवर्धन या जागतिकीकरणाच्या काळातही करावे लागणार आहे. मराठी आपली मातृभाषा आहे. म्हणून प्राथमिक शिक्षण हे मुलांना आपल्या मराठी मातृभाषेतूनच दिले जावे हेच यथोचित आहे. मातृभाषेतून दिले जाणारे शिक्षण मुले अधिक चांगल्या प्रकारे गृहण करतात. कारण ती हृदयाची भाषा असते. सध्या दैनंदिन व्यवहारातील मराठी भाषेचे महत्व उत्तरोत्तर कमी होत आहे. भविष्यात मराठीचे स्थान नक्कीच धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी आता बऱ्याच प्रमाणात जागरुकता निर्माण होत आहे. २७ फेब्रुवारी हा कुसुमाग्रजांचा (वि.वा.शिरवाडकर) जन्मदिन मराठी भाषा दिन म्हणून साजरा करतात. पण तरीही माधव जुलियन यांनी एक खंत व्यक्त केली होती. ***मराठी असे आमुची मायबोली, जरी आज ती राजभाषा नसे.*** त्यासाठी आता प्रयत्न होत आहे. बोलीभाषा हीच ज्ञानभाषा व्हावी यासाठी बरेचजण प्रयत्नशील आहेत.

उद्याची भावी पिढी सुशील आणि संस्करित करणारे शिक्षक व पालक यांच्यावर मराठी संवर्धनाची धुरा दिलेली आहे. मराठी भाषा सर्व श्रृंगारांनी, अलंकारांनी परीपूर्ण नटलेली आहे. असे म्हणतात की, जातीच्या सौंदर्याला श्रृंगाराची गरज नसते. त्यातीलच एक श्रृंगाराविनाच अप्रतीम अशी सौंदर्यवती, मोहक दिसणारी अशी माझी माय मराठी आहे. तिची किती रुपे आहेत. विविध भाषा प्रकार आहेत. तरीही प्रत्येक रुप तेवढेच गोड आहे. पण तरीही इंग्रजीच्या खोट्या हव्यासापायी आज तिचे महत्व कमी झाले आहे. तिचे स्थान उंचावण्यासाठी संमेलने, मराठी साहित्य वाचन, प्रदर्शन यांची खूप गरज आहे, कारण आपल्या घरी हजार पाहुणे पोसते मराठी परि आपुल्याच घरी हाल सोसते बहू मराठी. यासाठीच अशा विविध कार्यक्रम संमेलने, विविध उपक्रम यातूनच सर्व सरस्वतीपुत्र म्हणजेच लेखक, कवी यांचे मराठीविषयक साहित्य विचार, मनोगत हे सर्वांना अती मोलाचे आहेत. त्याने जे समाधान लाभते ते शब्दात वर्णन करता येत नाहीत. त्याला शब्दच नाहीत.

आपण सर्वांनी या मराठी मायबोलीचे पांग फेडायला हवेत. जगात तीन जननी आहेत १) जन्मदात्री २) मायबोली ३) भूमाता यापैकी आपण सर्वांचीच उतराई करायला हवी.

मला या ठिकाणी परत माधव जुलियन यांच्या मराठी मायबोली या कवितेतील ओळी आठवतात त्या अशा

***मराठी असे आमुची मायबोली,***
***जरी भिन्न धर्मानुयायी आम्ही असू।***
***पुरी बाणली बंधुता अंतरंगी,***
***हिच्या एका ताटात आम्ही बसू।***
***हिचे पुत्र आम्ही हिचे पांग फेडू,***
***वसे आमुच्या ह्न्मंदीरा,***
***हिला बैसवू वैभवाच्या शिरी।।***

पण यासाठी आपणा सर्वांना ही भाषा टिकविण्यासाठी आपल्या मुलांना घरांमध्ये मराठी भाषा बोलण्यासाठीच आग्रह धरला पाहिजे. आपणही त्यांच्याशी मराठीतच संवाद साधला पाहिजे. या ठिकाणी कविवर्य सुरेश भट यांच्या काव्यपंक्ती आठवतात. त्या अशा

***लाभले आम्हास भाग्य,***
***आम्ही बोलतो मराठी।***
***लाभले आम्हास भाग्य,***
***आम्ही ऐकतो मराठी,***
***लाभले आम्हास भाग्य,***
***आम्ही जाणतो मराठी।।***

खेरच आपली संस्कृती खूप महान आहे. आपल्या भाषेला आपण मातृभाषा मानतो. ते इतरत्र कुठेही पहावयास मिळत नाही. मराठी भाषेची व्यापकता खूप मोठी आहे. तिच्या बोलीभाषेचे किती तरी प्रकार/रुप पहावयास मिळते. प्रत्येक रुप तेवढेच मोहक, लोभसवाणे आहे. म्हणून ज्ञानेश्वर महाराजांनी म्हटले आहे की,

***माझा मराठाचा बोल कौतुके।***
***अमृतातेही पैजा जिके।***
***ऐसी अक्षरे रसिके। मिळवीन।।***

खरे पाहता प्रत्येक रुप तेवढेच आकर्षक वाटते. जसे की एक सुंदर विविधरंगी फुलांचा बगीचा आहे, त्यातील प्रत्येक फुल तेवढेच सुंदर आहे, सुगंधीत आहे, या प्रत्येक फुलाला एका धाग्यात गुंफले तर ते अधिकच खुलून दिसेल.

वि.दा.करंदीकरांच्या शब्दात सांगावयाचे झाले तर देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे. घेता-घेता घेणाऱ्याने देणाऱ्याचे हात घ्यावे. म्हणूनच या मायबोलीचे रक्षण, संक्रमण, संवर्धन सतत केले पाहिजे. हा वारसा पुढील पिढीकडे संक्रमित करण्याचा आम्ही नक्कीच प्रयत्न करु. पुणे हे तर मराठी भाषेचे माहेरघर असे म्हणतात. पुणेकर मुळाचे रसिकप्रिय, मराठीवर भरभरुन प्रेम करतातच. तर संपूर्ण महाराष्ट्रीयच मराठीवरती मनापासून प्रेम करतात.

याच मराठी दिनानिमित्त आम्हा सर्वांच्या हार्दिक शुभेच्छा. वि.वा.शिरवाडकर यांनाही आमची भावपूर्ण श्रध्दांजली. शेवटी मात्र असे म्हणेन या माझ्या मराठी बोलीसाठी रक्षण, संक्रमण, संवर्धनासाठी म्हणेन

***तमांतरी उजळून यावे बावनकशी सोने,***
***महान कार्या कोंदण माझे शुभेच्छांचे देणे।***

**सौ. अलका जोशी,**
**परवाना आकाशचिन्ह विभाग**

## मराठी भाषा संवर्धनाची गरज

जागतिक महासंघाच्या वतीने दि.२१ फेब्रुवारी २०१३ हा दिवस मुळ भाषा संवर्धन दिवस म्हणून जाहीर केला. त्या पार्श्वभूमीवर पुणे मनपाच्या वतीने दि.२१/२/१३ ते वि.वा.शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांच्या दि.२७/२/१३ रोजीचा वाढदिवस हा काळ (सप्ताह) हा मराठी सप्ताह म्हणून साजरा केला.

कोणतीही भाषा ही आपल्यातील भावना, विचार, मत प्रकट करण्याचे साधन आहे. जशी मनुष्यांची भाषा तशी पशु पक्षांचीही भाषा असते. जशी एखादी कोंबडी तिच्या पिलांना धोक्याची सूचना देवून तिच्यापासून दूर न जाण्याचा संदेश देते तथा दूर गेलेल्या पिल्लांना जवळ बोलावते, ती तिची भाषाच होय. तशीच मानवाची भाषा आहे. वेगवेगळ्या देशात वेगवेगळ्या भाषा बोलल्या जातात. परंतु जागतिकीकरण तथा माहिती तंत्रज्ञान, वाहतुकीची/दळणवळणाची सोय यामुळे एका देशातून इतर देशात स्थलांतरीत होवून त्या त्या देशातील मूळ भाषेमध्ये फरक पडत असतानाच एखाद्या भाषेच्या प्रभावाने त्या देशातील मूळ भाषा यांना धोका पोचू नये, या उद्देशाने जागतिक महासंघाने मूळ भाषा संवर्धन दिवस म्हणून दि.२१/२/२९१३ हा दिवस जाहिर केला.

वास्तविक पहाता ज्यांचे कोणतेच दिवस नसतात त्यांचे दिवस पाळले जातात. जसे महिला दिन. पुरष प्रधान संस्कृतीमध्ये महिलांचा मान सन्मान जो द्रविड सभ्यतेमध्ये होता, तो हरपला गेला, म्हणून तर स्त्री भृण हत्येसारख्या कांडांना आपल्याला तोंड द्यावे लागत आहे. तसेच बालदिन, बैलपोळा दिवस, इत्यादी. अशाच प्रकारे जागतिक महासंघाने सन १९९२ हे वर्ष मूळनिवासी वर्ष अर्थात **Indegenious year** म्हणून साजरा केला. सर्वच देशांमध्ये वेगवेगळ्या देशातील लोकांचे स्थलांतर झाल्यामुळे त्या देशाचे मूळ निवासी कोण आहेत, याचा शोध घेवून त्यांचेसाठी वर्ष साजरे करण्यासाठी हे वर्ष मूळ निवासी वर्ष म्हणून साजरे करण्यात आले. तसा आपल्या देशामध्ये मूळत: हा देश द्रविड सभ्यतेचा असून आर्यन, मंगोलीयन, हून, शकुन, कुषाण, मोघल, डच, फ्रेन्च, इंग्रज, पोर्तुगीज, पर्शियन, ईराणी, तुर्क, आदी लोकांनी भरलेला आहे.

भारत देश हा विविधतेने नटलेला देश आहे. त्यापैकी एक विविधता ही भाषेची विविधता आहे. हे भारत वर्ष पूर्वेकडील अफगाणिस्तान पासून संपूर्ण बंगाल तसाच उत्तरेकडील काश्मिर राज्यापासून श्रीलंका, ब्रम्हदेश पर्यंतचा असून त्यातून अफगाणिस्तान, पाकिस्तान व काश्मिर, बंगाल, पंजाब, हैद्राबादचा काही भाग भारत वर्षातून तुटून गेला. आजही भारत भाषावर प्रांतिक रचनेमुळे वेगवेगळ्या राज्यातून वेगळा करु पहात असून, भाषावार प्रांतिक वादामधून होरपळून निघत असल्याचे दिसत आहे. जम्मू काश्मिरमध्ये राहणारे व काश्मिरी भाषा बोलतात त्यांना काश्मिरी, राजस्थानमध्ये राहणारे राजस्थानी भाषा बोलतात त्यांना राजस्थानी, गुजरातमध्ये राहणारे गुजराती भाषा बोलतात ते गुजराती, तसेच बंगाली, पंजाबी, मल्याळी/केरळी, तमिळी, तेलगू, कानडी तसेच महाराष्ट्राची बोली भाषा मराठी बोलणारे व महाराष्ट्रात राहणारे ते मराठी/मराठा होय. यामध्ये कोणत्याही जातीचा, धर्माचा, पंथाचा असो जो महाराष्ट्रात राहातो व मराठी भाषा बोलतो तो प्रत्येकजण मराठा म्हणून संबोधला जातो, हे लक्षात घेणे महत्वाचे होय.

कोणत्याही भाषेचे वैशिष्ट्य लक्षात घेणे आवश्यक आहे, ते म्हणजे एक मैलावर भाषा बदलते, दोन कालपरत्वे भाषा बदलते. इसवी सन पूर्व काळापासून मगधी, अर्धमगधी, पाली अशा प्राकृत भाषा म्हणजे बोलीभाषा होत्या. त्या आज लोप पावलेल्या दिसतात. महाराष्ट्रातील मराठवाडा, विदर्भ तथा खानदेशी येथील मराठी भाषेमध्ये फरक दिसून येतो. विदर्भ येथे वऱ्हाडी भाषा ऐकण्यात येते, तेथे मले, तुले अशा प्रकारे बोलले जाते. तीच मराठी पश्चिम महाराष्ट्रामध्ये वेगळ्या पध्दतीने बोलली जाते. तीच भाषा मुंबई, पुण्यामध्ये वेगळी बोलली जाते. १००-१२५ वर्षांपूर्वीची भाषा आज अवघड वाटते. महात्मा ज्योतिराव फुले यांनी शेतकऱ्यांचा असूड या पुस्तकामध्ये एक कविता लिहिलेली आहे. ती अशी

***विद्येविना मति गेली।***
***मति विना निती गेली ।।***
***निती विना गति गेली।***
***गति विना वित्त गेले।।***
***वित्ता विना शुद्र खचणे।***
***इतके अनर्थ एका अविद्येने केले।।***

ही भाषा आपणाला थोडी अवघड वाटते. पण या व्यतिरिक्त काही जातींच्याही बोली भाषा होत्या. एका जातीची भाषा, त्या जातीचे नाव सांगत नाही, एक पुरष आपल्या महिलेला सांगतो, केमटे निभय धांगली कानव नालकीकून खोनाव्याला ईल. ते मात्र त्या दोघांनाच कळते. शेजारी बसलेल्यांना कळत नाही. याचा अर्थ असा की, अगं इथून निघून वशाट (मटण) घेवून ये, चांगलं चमचमीत बनवून संध्याकाळी (जेवणाचे वेळेस) वाढ. परंतु हिच भाषा त्या जातीच्या लोकांना मात्र आज येत नाही. मी कोष्ठी लोकांच्या बैठकीला गेलो असता, मला असे कळले की, त्यांची एक वेगळी बोली भाषा असून आताच्या तरुण पिढीला मात्र ती अवगत नाही. तशीच ही मराठी भाषा ५०/६० वर्षांपूर्वी मोडी लिपीमध्ये लिहिली जायची, पण आता मात्र ती आपणास वाचणे कठीण आहे. पूर्वी जे शब्द वापरले जात ते मराठीच होते. पण तेच शब्द आज आपणास अपरिचित वाटतात. आज बोलली जाणारी मराठी भाषा ५०-१०० वर्षांनी बदललेली असणार आहे. आजच्या मराठी भाषेसाठी वर्ग चालवावे लागतील. मराठी भाषेच्या बाबतीत अशीच गत होत असल्याची चिन्हे दिसून येत असावीत. त्यामुळे मराठी भाषेचा सप्ताह पाळण्याची वेळ येत आहे, असे मला वाटते.

मराठीचा व मराठी भाषेचा अभिमान बाळगावा, अशा घोषणा देणाऱ्यांचीच मुले-मुली इंग्रजी माध्यमांच्या शाळेमध्ये असल्याचे दिसून येते, अर्थात याला अपवाद असणार आहे. मराठीचा व मराठी भाषेचा अभिमान हा भावनिक असू नये, या मताचा मी आहे. तसेच या भावनिक अभिमानास्तव इतर भाषा दुर्लक्षीत करावयात असे नाही. कोणतीही भाषा संस्कृतीचे दर्शन घडवते. त्यामुळे भाषेची जपणूक, संवर्धन करणे म्हणजेच संस्कृतिचे जतन करणे, संवर्धन करणे होय. भाषा, संस्कृतिप्रमाणेच परंपरा, रितीरिवाज, सभ्यता याचे प्रतिक आहे. म्हणून मराठी भाषेचे संवर्धन करणे म्हणजे महाराष्ट्राची संस्कृति, परंपरा, रितीरिवाज, सभ्यता, आदर्श यांचे संवर्धन करणेसारखे आहे. महाराष्ट्रातून नव्हे मराठी मायभूमीतून संत नामदेव, तुकाराम, एकनाथ, गोरा कुंभार, सावता माळी, तुकडोजी महाराज, आदी संतांनी महाराष्ट्राच्या मराठी परंपरेचे दर्शन घडविले आहे. नामदेवे रचिला पाया, तुका झालासे कळस।।

मराठी भाषेचे संवर्धन करणे ही एक बाब आहे. परंतु मराठी भाषेची वाढ करणे अर्थात मराठी भाषेमध्ये शक्ती निर्माण करणेची आवश्यकता आहे. प्रगती करावयाची असेल तर इंग्रजी भाषा शिकावी लागेल. परंतु जपान, जर्मनी सारख्या देशात जावून प्रगती करावयाची असेल तर जपानी, जर्मनी भाषा शिकावी लागते. इंग्रजी यायलाच पाहिजे जरुरी नाही. मी एकदा जपानी लोकांच्या शिबीराला गेलो, जपानी लोक सर्व डॉक्टर होते. परंतु यातील एकही जपानी डॉक्टरला इंग्रजी बोलता येत नव्हते. त्यामुळे मराठी, जपानी तथा इंग्रजी-जपानी भाषा येणाऱ्या दुभाषिकाचा वापर करावा लागला. हे सांगण्याचे तात्पर्य हे आहे की, मराठी भाषेमध्ये इतकी शक्ती निर्माण करणे गरजेचे आहे की, इतर सर्व लोकांची मराठी भाषा गरजेची भाषा वाटली पाहिजे. अनेक संतांनी महाराष्ट्र व मराठा तथा मराठी भाषा या संबंधाने म्हटले असून, त्यांचे दाखले देवून मोठ्या आवाजात सांगणे अथवा अलंकारीत आवाजात सांगणे, अत्यंत सोपे आहे. तुमचं त्यात काय आहे? त्यामुळे भावनिक दृष्टीने मराठी भाषेचा नव्हे महाराष्ट्र सभ्यतेचा अभिमान बाळगण्यापेक्षा मराठी संवर्धनाइतकीच मराठी भाषेमध्ये शक्ती निर्माण करण्याचं कार्य करणे, अत्यंत गरजेचे आहे. मी हे करतो आहे, आपण ही असंच कराल, अशी अपेक्षा करतो.

**विजय कांबळे,**
**औंध क्षेत्रीय कार्यालय**

पान क्र. १ वरुन

## महापालिका कर्मचाऱ्यांचे नाटक

महापालिका कर्मचाऱ्यांनी सादर केलेले प्रेमाच्या गावा जावे या नाटकाचा प्रयोग दिनांक १५/२/१३ रोजी बालगंधर्व रंगमंदीर येथे संपन्न झाला.नाटकाच्या सादरीकरणामध्ये श्री. मंगलदास माने व श्री. आदर्श गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेतले.सदर नाटकाचे दिग्दर्शन प्रसिध्द नाट्य व चित्रपट अभिनेते श्री. रविंद्र महाजन यांनी केले. या नाटकात तंत्रज्ञासह मनपाच्या १२ अधिकारी व सेवकांनी आपापल्या भूमिका समरसून करीत नाटकांचा निखळ आनंद उपस्थित रसिक प्रेक्षकांना दिला. नाटकाचा आस्वाद घेण्यासाठी मा. ज्ञानेश्वर मोळक, सह महापालिका आयुक्त, मा. डी.पी.मोरे, उप आयुक्त (गवनि), मा. रमेश शेलार, उप आयुक्त (अतिक्रमण), मा. अरुण खिलारी, कामगार कल्याण अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, मा. संतोष पवार, सुरक्षा अधिकारी हे उपस्थित होते.

**सांस्कृतिक कार्यक्रम** – महापालिका वर्धापन दिनानिमित्त दि.१५/२/१३ रोजी मनपा कर्मचाऱ्यांचा विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम बालगंधर्व रंगमंदीर येथे आयोजित करण्यात आला होता. यामध्ये मनपाच्या सेवकांनी समुहनृत्य, वैयक्तिक नृत्य,भजन, फॅन्सी ड्रेसचे सादरीकरण, मिळून साऱ्या जणी ही एकांकिका, कविता वाचन, इ.कार्यक्रम सादर केले. या कार्यक्रमास अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सांस्कृतिक कार्यक्रमानंतर महापालिका अधिकारी सेवकांचा हिंदी/मराठी गीतांचा वाद्यवृंदाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास मा. वैशाली बनकर, महापौर, पुणे या उपस्थित होत्या. त्यांनी सर्व कलाकारांना वर्धापन दिनाच्या शुभेच्छा देवून त्यांचे कौतुक केले.तसेच, सर्व कलाकारांना पुष्पगुच्छ देवून त्यांचा यथोचित गौरव केला. दरम्यान मा. महापौर यांनी कलाकारांना त्यांच्या आवडीचे गीत गाण्यास सांगितले व कलाकारानीही मोठ्या उत्साहाने त्यांची फर्माईश पूर्ण केली.

## विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन

वर्धापन दिनानिमित्त पं. नेहरु स्टेडियम येथे विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. क्रिकेट सामन्यांचे उद्घाटन मा. महापौर, पुणे यांचे हस्ते नाणेफेक करुन करण्यात आले. तसेच, मा. महापौर यांनी फलंदाजी केली व त्यांना मा. महापालिका आयुक्त यांनी गोलंदाजी करुन सामन्याचे उद्घाटन केले. या स्पर्धांमध्ये मा. महापौर, सौ. वैशाली बनकर, मा. सुभाष जगताप, तसेच अन्य पदाधिकारी, मा. महेश पाठक, महापालिका आयुक्त, मा. अनुपकुमार यादव, अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि), मा. राजेंद्र जगताप, अतिरिक्त महापालिका आयुक्त (इ), विविध वर्तमानपत्रांचे प्रतिनिधी, वाहिन्यांचे प्रतिनिधी मोठ्या उत्स्फुर्तपणे सहभागी झाले होते. यावर्षी आयोजित करण्यात आलेल्या क्रिकेट स्पर्धेत पत्रकार संघाने एकही गडी न गमावता बिनबाद १० षटकात ९४ धावा करुन मनपा महापौर संघावर एकतर्फी विजय मिळविला. याबरोबरच धावणे, बॅडमिंटन, संगित खुर्ची, चमचा लिंबू अशा विविध स्पर्धा संपन्न झाल्या. पं. नेहरु स्टेडियम येथील नवीन डॉनिक वार्डनर ९०९ या टेबल टेनिस टेबलचे उद्घाटन मा. महापौर, सौ. वैशाली बनकर यांनी केले. या प्रसंगी मा. महेश पाठक, महापालिका आयुक्त, तसेच टेबल टेनिस असोसिएशनचे महाराष्ट्राचे जनरल सेक्रेटरी व राष्ट्रीय खेळाडू मनिषा बोड्स उपस्थित होत्या.






## प्राचार्य डांगे यांच्या ग्रामीण भागातील शैक्षणिक गुणवत्ता – सद्यस्थिती व उपाय या विषयावरील निबंध लेखनास प्रथम क्रमांक

कै. यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी वर्ष व मा. शरद पवार, कृषिमंत्री,भारत सरकार यांच्या वाढदिवसानिमित्त पश्चिम महाराष्ट्रातील शिक्षकांसाठी वेगवेगळ्या विषयांवर निबंधस्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, पुणे अशा ५ जिल्ह्यातून ५०० पेक्षा अधिक शिक्षकांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये श्री.सदाशिव नाना डांगे, प्राचार्य, श्रीमती सावित्रीबाई फुले प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, भवानीपेठ यांनी सादर केलेल्या निबंधलेखनास प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मा. दिलीपरावजी वळसे पाटील, विधानसभा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते मिळाले.



यशवंत-शरद प्रबोधिनी व संशोधन संस्था, पुणे या संस्थेने हा उपक्रम राबविला होता.

श्री. डांगे यांनी प्राप्त केलेल्या यशाप्रित्यर्थ कामगार कल्याण निधीतर्फे त्यांना हार्दिक शुभेच्छा.

# पुणे महानगरपालिकेमध्ये मराठी आठवडा उत्साहाने साजरा

ज्येष्ठ कवी वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा दि.२७ फेब्रुवारी हा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करणेबाबत मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन यांनी शासन निर्णय प्रसृत केला आहे. त्या अनुषंगाने पुणे मनपामध्ये दि.२१ ते २७ फेब्रुवारी, २०१३ अखेर मराठी आठवडा साजरा करण्यात आला.

घोलेरोड आर्ट गॅलरी येथे दि.२१ व २२ फेब्रुवारी, १३ रोजी मराठी साहित्याची, नव्या माहितीची, आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाची मराठीतील पुस्तके वाचकापर्यंत पोहचविण्याच्या हेतूने साहित्य प्रदर्शनाचे आयोजन करणेत आले. सदर प्रदर्शनाचे उद्घाटन दि.२१/२/१३ रोजी मा.विजय दहिभाते, सह महापालिका आयुक्त, पुणे मनपा यांचे हस्ते व प्रा.अनिल गोरे, अध्यक्ष, समर्थ मराठी संस्था यांचे उपस्थितीत करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाचे आयोजक मा.शिवाजी दौंडकर, सल्लागार (कामगार), श्री.नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी तसेच श्री. युसुफ पठाण, श्री.अविनाश सकपाळ, श्री.नितीन उदास, श्री.विजय लांडगे, महापालिका सहाय्यक आयुक्त, मनपा सेवक/अधिकारी उपस्थित होते. दोन दिवसांच्या प्रदर्शन कालावधीत या प्रदर्शनास २०० पेक्षा अधिक नागरिकांनी भेट दिली.

दि.२५/२/१३ रोजी मनपा सेवकांसाठी सुंदर हस्ताक्षर, शुध्दलेखन व निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. सुंदर हस्ताक्षर स्पर्धेमध्ये एकूण ४९, शुध्दलेखन ४७ व निबंध स्पर्धेमध्ये १७ सेवकांनी सहभाग घेतला होता.

दि.२६/२/१३ रोजी मनपा सेवकांसाठी वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेमध्ये एकूण ६ सेवकांनी सहभाग घेतला होता.

सुंदर हस्ताक्षर व शुध्दलेखन या स्पर्धांसाठी सौ. रोहिणी गायकवाड, शिक्षिका, शिक्षण मंडळ तर निबंध व वक्तृत्व या स्पर्धांसाठी सौ. सविता साळुंके, शिक्षिका, शिक्षण मंडळ यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले.

महानगरपालिकेतील सर्व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये नागरिकांना व सेवकांना मराठी आठवड्यानिमित्त शुभेच्छा दर्शक फलक लावणेत आले आहेत.

मराठी आठवड्यानिमित्त आयोजित वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, शुध्दलेखन स्पर्धा इत्यादी स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ दिनांक २७ फेब्रुवारी, २०१३ रोजी कॅ. वडके हॉल येथे संपन्न झाला. सदर कार्यक्रमास अतिरिक्त महापालिका आयुक्त (इ), मा. राजेंद्र जगताप प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच, समर्थ मराठी संस्थेचे अध्यक्ष मा. अनिल गोरे, उपाध्यक्ष मा. सुधीर नारखेडे, व सल्लागार (कामगार) मा. शिवाजी दौंडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धेतील विजेत्यांना पुष्पगुच्छ, स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्रक देवून सन्मानित करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री. नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी यांनी केले.




# जवाहरलाल नेहरु शहरी विकास योजनेंतर्गत मनपा विकास प्रकल्पांचे नियोजन कौतुकास्पद

पुणे मनपाचे जवाहरलाल नेहरु शहरी पुनर्विकास योजनेंतर्गत केलेल्या विविध प्रकल्पांना उत्तर भारताकडील ५ शहरातील लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांनी भेट दिली व विकसित करण्यात आलेल्या प्रकल्पांची माहिती घेतली.

पुणे मनपाने विकसित केलेल्या प्रकल्पांची माहिती घेवून व प्रत्यक्ष भेटीनंतर सर्व प्रकल्पांचे यशस्वी नियोजनाबाबत मान्यवर पाहुण्यांनी प्रशंसोद्गार काढले.

जवाहरलाल नेहरु शहर पुनर्विकास योजनेंतर्गत विविध शहरांनी केलेल्या विकास कामांची अन्य शहरातील स्थानिक स्वराज्य संस्थेतील पदाधिकारी, अधिकारी यांनी माहिती घ्यावी व प्रकल्पांना भेटी देवून प्रकल्पांबाबत माहिती घ्यावी व सदर प्रकल्पांच्या अंमलबजावणी व नियोजन आपल्या शहरात कसे करता येईल याची माहिती घेण्याकरिता केंद्र शासनाने पुणे शहराची निवड केली होती. त्यानुसार पुणे शहरातील जेएनएनयुआरएम प्रकल्पांतर्गत प्रकल्प पाहणी करिता उत्तर भारताकडील ५ शहरातील पदाधिकारी, अधिकारी यांनी मनपास भेट दिली.

केंद्र शासनाच्या नॅशनल इन्स्टिट्युट अर्बन अफेअर अंतर्गत "Peer Experience And Reflective Learning (PEARL)" अंतर्गत सौ. निलंजना दास सुर यांनी भेटीचे नियोजन केले होते.

मा. महापालिका आयुक्त कार्यालय सभागृहात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. मा. वैशाली बनकर, महापौर, पुणे यांनी उपस्थित मान्यवरांचे शाल, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देवून स्वागत केले.या प्रसंगी मा. महेश पाठक, महापालिका आयुक्त यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे जेएनएनयुआरएम अंतर्गत विकसित करण्यात आलेल्या प्रकल्पांची सविस्तर माहिती दिली. या वेळी मा. दीपक मानकर, उपमहापौर, मा. वसंत मोरे, विरोधी पक्षनेता, मा.विवेक खरवडकर, अतिरिक्त नगर अभियंता( बांधकाम), मा. श्रीनिवास बोनाला, अतिरिक्त नगर अभियंता (प्रकल्प), मा. सुधाकर देशमुख, विशेष कार्याधिकारी, मा. व्ही.जी.कुलकर्णी, अधिक्षक अभियंता (पाणीपुरवठा) व प्रकल्पासंदर्भातील अन्य अधिकारी उपस्थित होते.बैठकीप्रसंगी मा. विरोधी पक्षनेते यांनी आभार प्रदर्शन केले.

# माहे फेब्रुवारी, २०१३ सेवापूर्ती समारंभ

दि.२८/२/१३ रोजी कै. वडके हॉल येथे फेब्रुवारी,१३ मधील सेवानिवृत्त २२ अधिकारी/सेवकांसाठी सेवापूर्ती समारंभ आयोजित केला होता. यामध्ये १८ वयपरत्वे व ४ ऐच्छिक सेवानिवृत्तांचा सत्कार करण्यात आला.प्रमुख पाहुणे म्हणून मा.राहुल जगताप, सांख्यिकी व संगणक प्रमुख तसेच श्री.फराटे, अधिक्षक अभियंता, श्री.गोडबोले सेवानिवृत्त सेवक संघ हे उपस्थित होते. प्रास्ताविकात मा.नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सेवापूर्ती समारंभ आयोजित करण्यामागची भूमिका विषद केली.तदनंतर मा.जगताप यांनी मनपाची दीर्घ सेवा पूर्ण करुन सेवानिवृत्त होणाऱ्या सेवकांचे आभार मानले व आपले उर्वरित आयुष्य आरोग्यसंपन्न व सुखासमाधानाने व्यतित करण्याबाबत नमूद करुन सर्वांना भावी आयुष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.त्यानंतर सेवानिवृत्त सेवकांचा शॉल व स्मृतीचिन्ह देवून सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. सूर्यकांत चांदेरे, ज्युनिअर ग्रेड लेखनिक यांनी केले.



# होळकर पुलाच्या निर्मितीकरिता पुणे मनपास पुरस्कार प्रदान

पुणे मनपाच्या वतीने होळकर पुल परिसरात नव्याने विकसित केलेल्या पुलास पायाभुत सुविधा प्रकल्पांतर्गत पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सदर पुलाचे काम बांधकाम क्षेत्रातील नामवंत जे.कुमार इंफ्राप्रोजेक्ट्स लि. ॲण्ड कन्सल्टंट्स टेक्नोजेम कन्सल्टंट्स प्रा.लि. यांनी अतिशय उत्तम प्रकारे व वेळेपूर्वी पूर्ण केले आहे.

भारतीय काँक्रीट संस्था, पुणे व अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने बांधकाम प्रकल्पांकरिता स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

बिर्ला ग्रुप ऑफ कंपनीच्या वतीने सदरच्या स्पर्धा या मागील वर्षापासून सुरु करण्यात आल्या. यामध्ये खाजगी बांधकाम कंपन्यांचा समावेश प्राधान्याने असतो. यंदाचे वर्षी सुमारे २९ कंपन्यांनी सहभाग नोंदवला होता. यामध्ये शासकीय स्तरावर सहभाग असणारी पुणे महानगरपालिका एकमेव होती.

या पुलाच्या उपक्रमासंदर्भात आयोजकांच्या परिक्षण समितीने याबाबत माहिती घेवून पाहणी करुन निर्णय जाहीर केला. परिक्षण समितीमध्ये भारतीय काँक्रीट संस्था, पुणे यांचे अध्यक्ष श्री. आर.एम.तेलंग, बांधकाम सल्लागार एस.डब्ल्यु.मोने, श्री. उज्वल कुंटे वास्तुरचनाकार श्री.सारंग यादवाडकर, अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड कंपनीचे श्री. अजित राधाकृष्ण यांचा सहभाग होता.

पारितोषिक वितरण समारंभ बंडगार्डन रस्त्यावरील सन ॲण्ड सॅन्ड हॉटेलमध्ये संपन्न झाला. पायाभुत सुविधा प्रकल्पाकरिता पुणे महापालिकेस जाहिर करण्यात आलेला पुरस्कार अतिरिक्त नगर अभियंता श्रीनिवास बोनाला व जवाहरलाल नेहरु शहर पुनर्विकास योजना विभागातील उपअभियंता सौ.मिरा सबनीस व कनिष्ठ अभियंता निलेश सैतवाल यांनी स्विकारला. सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

## हे स्त्री

तू पत्नी है, तु जननी है
दुखसुख की जीवन संगनी है
तू है पुत्री तू है बहना
तेरे अस्तित्व का क्या कहना?

तेरे बिन यह घर यह संसार अधूरा है
तेरे होने से ही तो जीवन गंवारा है

हे स्त्री,

तेरी भक्ति और परम शक्ति के चरणों मे
अभिवादन हमारा है
अभिवादन हमारा

**राजदीप बि.धुसिया, उप अभियंता**
**परवाना व आकाशचिन्ह विभाग**

## मी मराठी

मी मराठी आहे, कारण ३१ डिसेंबरला दणक्यात सेलिब्रेशन केलं, तरी गुढीपाडव्याला कपाळावर चंद्रकोर रेखून, हातभर बांगड्या घालून, जिभेवर कडू-गोड गोळीची चव चाखत मनापासून नवीन वर्षाचे स्वागत करते।।
मी मराठी आहे, कारण कॉलेजमधून येताना टाइमपास मंचुरियन खाउन आले, तरी वरणभात आणि साजुक तुपाशिवाय माझं भागत नाही..
मी मराठी आहे, कारण रिकी मार्टिनच्या गाण्यावर माझे पाय थिरकले तरी बाबूजींचे तोच चंद्रमा नभात ऐकल्यावर नकळतच तोंडातून वाह निघून जातं..
मी मराठी आहे, कारण मित्र-मैत्रिणींसोबत थ्री-फोर्थ जीन्स आणि स्लिव्हलेस टॉप धालून धम्माल पार्टी केली तरी संक्रांत दसऱ्याला काठापदराची साडी नेसून, मोगऱ्याचा गजरा माळून तितक्याच उत्साहात सगळ्यांकडे जायला मला आवडतं..
आम्ही मराठी आहोत, कारण कितीही इम्पोर्टेड कॉस्मेटिक्स पर्फ्युम्स वापरले तरी उटण्याशिवाय आणि टिपिकल चंदन साबणाशिवाय आमची दिवाळी साजरी होउच शकत नाही..
आम्ही मराठी आहोत, कारण प्रवासाला जाताना गाडीतून एखादं मंदीर दिसलं, की नकळत आमचे हात जोडले जातात.
आम्ही मराठी आहोत, कारण अगदी अत्याधुनिक होम अप्लायन्सेसने घर सजवलं तरी दाराला झेंडूच्या फुलांचं आणि आंब्याच्या पानांचं तोरण लावल्याशिवाय समाधान होत नाही.जात कोणतीही असो, आम्ही महाराष्ट्रीयन आहोत., आणि आमच्यातलं मराठीपण जोपासण्याची मला आवश्यकता नाही, कारण ते मराठीपण माझ्या रक्तात भिनलय.. आणि या मरठीपणाचा मला अभिमान आहे.।।

## अतिक्रमण कारवाई

अतिक्रमण कारवाई करताना असते गडबड घाई
नोटिसा पाठवूनही वारंवार मिळत नाही साथ तेंव्हा होते कारवाई
नगर रचना आराखड्याच्या मान्यतेची पायमल्ली केल्याने
मेहनत सर्व वाया जाई
सगळीकडे आजूबाजूला जमा होते फार गर्दी
गर्दीमध्ये पांगते सर्वत्र नानाविचारांची सर्दी
गोंधळ होवू नये यासाठी राबते खाकी वर्दी
वातावरणात तयार होते फार गरमागर्मी
अशा वेळी जतावतात बरेचजण हमदर्दी
अतिक्रमण कारवाई करणाराही असतो माणूस
कर्तव्यपूर्तीसाठी कठोरतेने धरावी लागते कारवाईची कास
त्यांच्याजवळही नांदतात नितीमूल्ये खास
परि भावनेहूनही कर्तव्य श्रेष्ठ असते हमखास
शहराच्या सौंदर्यात बाधा पोहोचू नये हीच मनीची आस
अतिक्रमण कारवाईत नसतो अतिक्रमणाला आसरा
घेतला जरी त्याने कोणा लोकप्रतिनिधीचा सहारा
शहराचे सौंदर्य अबाधित राखणे हाच आपला नारा
थक्क होतात ही कारवाई पाहून कित्येक नजरा
सर्वत्र मिळते या कारवाईला मनापासून दाद
शिव्याशापांच्या लाखोळीची नसे मोजदाद
सोपे नव्हे भूषविणे अतिक्रमण उप आयुक्ताचे पद
त्यांचे त्यांनाच माहित त्याचे काय उमटतात पडसाद
उप आयुक्त (अतिक्रमण) तुमचा वाटतो आम्हा अभिमान
कार्य हे कठीण बहु हे जाणतात सर्वचजण
सहकारी तुमचे आहेत सहकार्याची खाण
त्याशिवाय का होते इतुके कार्य महान
नागरिक आणि लोकप्रतिनिधी संबंधित हा खेळ उन्हंपावसासारखा
तरी पांघरावा लागतो तुम्हा शांततेचा अंगरखा
कुणाचा द्वेष, कुणाचा रोष ओढवतो सारखा
पटवून द्यावे लागते समंजसपणे शत्रु नव्हे तर
कायद्याचे पाईक आम्ही
उच्च न्यायालयाने दिले आदेश होर्डिंग्ज काढण्याचे
पेलले खरे तु शिवधनुष्य आदेशाचे
एवढे वर्ष पुण्याचे स्वरुप होते घुसमटलेले
चौदा मार्चच्या दिवशी पुण्याचे स्वरुप पालटले
घुसमटलेल्या आकाशाने दिगंतराने मोकळे श्वास घेतले
वारा वदे कानांमध्ये वाहण्यासी मज मोकळे प्रांगण मिळाले
करितो आम्ही अभिनंदन आपुले
तुम्हासहीत सर्व सहकाऱ्यांना
असे मनापासूनी मानाचा मुजरा

**सौ. अलका जोशी,**
**परवाना आकाशचिन्ह विभाग**

## ओळखा पाहू मी कोण?

### वात्रटिका

घाबरत घाबरत, मी रस्त्याने चाले,
अपराधी भावनेने रस्ते ओलांडे,
नाही मजकडे वाहन चारचाकी दुचाकी,
वाहनांच्या पसाऱ्यात मी पडलो एकाकि
**---- *पादचारी***

नोकरी कुठे मिळेना
घरी कोणी बसू देईना
लावता गाडी वडापावची
पोट म.न.पा.भरु देईना
**---- *सुशिक्षित बेरोजगार***

नाही मला फुरसत,
क्षण एक थांबण्याची,
गौण मला सारे,
सिग्नल, सायकली, पादचारी
ताकद माझ्या हाती, चरणी
जाईन मी सर्वांच्याच पुढे
**---- *काही वाहन चालक***

सकाळी उठून कोठी गाठतो,
हद्दीतील केरकचरा लोटून घेतो
घाण-सू करणाऱ्यास दंड लावतो
वेळी स्वत: ही दंड भरतो (मेमो)
**---- *वॉर्ड ऑफिसमधील एक काळचा कनिष्ठ अभियंता***

नाही मज काळजी आईबापाची
नाही चिंता मजला
कर्तव्य वा देशाची
हवी आहे मला फ्लॅट, गाडी
व सोबत एक सुंदर तरुणी
**--- *आजचे काही तरुण***

मी ठेवतो सारे, सुंदर आणि व्यवस्थित
माझे घर, माझे कार्यालय, माझे शहर
सारे जग माझे, मी पालक या जगाचा
आहे प्रत्येक गोष्टीस, मीच एक जबाबदार
**-- *एक सिध्द समाधी योग साधक***

**राजदीप बि.धुसिया, उप अभियंता**
**परवाना व आकाशचिन्ह विभाग**

## स्वामी विवेकानंदांच्या स्वप्नातील युवक

चेहऱ्यावर ज्याच्या तेज आहे.
देहामध्ये शक्ती आहे.
मनामध्ये उत्साह आहे.
बुध्दीमध्ये विवेक आहे.
हृद्यामध्ये करुणा आहे.

कल्याणवार्ता
फेब्रुवारी, २०१३
प्रकाशक तथा अध्यक्ष
कामगार कल्याण निधी
मा. आयुक्त,
पुणे महापालिका
❖ संपादक ❖
मा.सल्लागार (कामगार)
❖ कार्यकारी संपादक ❖
कामगार कल्याण अधिकारी
❖ सहाय्यक ❖
सौ. ज्योती अ.भोसले
❖ मुद्रक ❖
जयंत पवार
व्यवस्थापक,
मुद्रणमहर्षि मामाराव दाते
मुद्रणालय, मनपा, पुणे.
❖ प्रकाशन स्थळ ❖
पुणे महापालिका
शिवाजीनगर,
पुणे ४११ ००५
या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी प्रकाशक, संपादक, कार्यकारी संपादक व पुणे महापालिका सहमत असतीलच असे नाही.
❖ संपर्क ❖
सल्लागार (कामगार) कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
दूरध्वनी क्र. २५५० १२५५/१२५२/१२५३
ईमेल आयडी
shivaji.daundkar
@punecorporation.org